


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

वर्ष ५ । अंक १६४ । सोमवार १६ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## अभिषेक कळमकर पोलिसांना सापडेना

### पीडित महिलेचा आत्मदहनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अत्याचाराचा गुन्हा दाखल होऊन महिना होत आला तरी माजी महापौर तथा राष्ट्रवादी शरद पवार गटाचा शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर अद्याप पोलिसांना सापडू शकलेला नाही. त्यामुळे हवालदिल होऊन या पीडितेने आत्मदहनाचा इशारा दिला आहे. अभिषेक कळमकरवर पंचवीस वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याचा गुन्हा २१ फेब्रुवारी २०२६ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाला असून हा गुन्हा तोफखाना पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ हे या प्रकरणाचा तपास करत असून महिना होत आला तरी अद्याप कळमकरचा ठावठिकाणा पोलिसांना लागलेला नाही.



दरम्यान, पोलिसांनी अभिषेक कळमकर याला लवकरात लवकर पकडावे अशी मागणी पीडितेने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे लेखी निवेदन देऊन केली आहे. मी पूर्णपणे घाबरुन गेली असून मी व माझे कुटुंबीय भयभीत झालो आहोत. अभिषेक कळमकर जर पोलिसांना सापडत नसेल तर तो किंवा त्याचे गुंड माझ्या किंवा माझ्या कुटुंबीयांचे काहीतरी बरेवाईट करु शकतात. त्यामुळे कळमकर याला पोलिसांनी तात्काळ अटक करावी व माझ्या कुटुंबीयांना व मला या संकटातून वाचवावे. कळमकरला लवकरात लवकर अटक न झाल्यास येत्या २५ मार्च रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा इशाराही पीडितेने दिला आहे.

## ‘पुर्णवाद’चे चेअरमनसह तिघे ठेविदारांकडून पोलिसांच्या ताब्यात

### आरोपींना पुन्हा पोलीस कोठडी । ठेवीदारांची सतर्कता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील जुने कोर्ट परिसरातील पूर्णवाद नागरी पतसंस्था प्रकरणात ठेवीदारांनीच पुढाकार घेत आरोपींना पकडून कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना नुकतीच घडली. आरोपींना पोलीसांनी न्यायालयात सादर केले असता पुन्हा तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

या प्रकरणात अध्यक्ष चेअरमन सत्यशील अविनाश अकोले (रा. पूर्णवाद नगर, जळगाव) व्यवस्थापक, महेश सुधाकर कुलकर्णी (रा. गोडावूनजवळ, केडगाव) आणि संचालक जितेंद्र कृष्णमूर्ती कुलकर्णी (रा. सहकारनगर, सावेडी) यांना ताब्यात घेण्यात आले होते.

याबाबत अमेय रमेश मुदकवी (रा. बागरोजा हडको, दिल्लीगेट) यांनी २०२४ मध्ये कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी पतसंस्थेत तब्बल ४२ लाख रुपयांची ठेव ठेवली होती. त्यावर १३ टक्के परतावा देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र मुदत संपूनही मुद्दल व व्याजाची रक्कम देण्यास पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी टाळाटाळ



केल्याने अखेर ठेवीदारांनी पोलिसांत धाव घेतली.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींचा शोध ठेवीदार घेत होते. मंगळवारी रात्री ठेवीदारांनीच पुढाकार घेत आरोपींना पकडून कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता प्रथम दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर तपासाच्या दृष्टीने पुन्हा तीन दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाने मंजूर केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलिसांकडून सुरू असून, ठेवीदारांच्या रकमेबाबत आणि पतसंस्थेच्या व्यवहारांबाबत सखोल चौकशी केली जात आहे.

## १०० टक्के शास्तीमाफी योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

### थकीत मालमत्ता करावरील शास्तीमाफी योजनेला नागरिकांचा प्रतिसाद । थकबाकीदार मालमत्ताधारक नागरिकांनी योजनेला लाभ घेऊन तात्काळ थकीत कर भरावा : आयुक्त डांगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महापालिकेने थकीत मालमत्ता कराच्या वसुलीला गती देण्यासाठी थकीत रकमेवरील शास्तीत (दंड) १०० टक्के सूट देण्यासाठी १५ मार्चपर्यंत मुदत दिली होती. या कालावधीत थकबाकीदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. मात्र, अद्यापही मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. त्यामुळे शास्तीमाफीची मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देऊन थकबाकी भरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी १०० टक्के शास्ती माफीची घोषणा करण्यात आली होती. १५ मार्चपर्यंत थकीत करावरील दंडाची रक्कम पूर्णपणे ■ पान ४ वर





## स्वच्छता व स्वयंशिस्तीतून कचरा मुक्त शहर घडविण्यासाठी योगदान द्या - आमदार संग्राम जगताप

### भिंगारच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योगभवनाचे लोकार्पण । उद्यानात ओपन जिम व स्वच्छतागृहासाठी निधी देण्याची घोषणा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजातील नागरिकांना एकत्र आणून सामाजिक, पर्यावरणीय आणि निरोगी जीवनशैलीची चळवळ उभारणारे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे कार्य प्रेरणादायी आहे. भिंगार शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून कचरा मुक्तीसाठी प्रत्येकाने स्वयंशिस्त पाळणे अत्यंत गरजेचे आहे. सार्वजनिक स्वच्छता हीच आरोग्याची पहिली पायरी असून याबाबत समाजात जागरूकता निर्माण झाली पाहिजे. उद्याच्या सक्षम पिढीसाठी आजपासूनच स्वतःवर निर्बंध आणत स्वच्छतेला प्राधान्य देण्याची मानसिकता तयार करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग व प्राणायामासाठी उभारण्यात आलेल्या योगभवनाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी उद्यानात ओपन जिम तसेच स्वच्छतागृह उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा त्यांनी केली. या कार्यक्रमाला भिंगार छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे यांच्यासह ग्रुपचे सदस्य व उद्यानात येणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार जगताप पुढे म्हणाले की, ■ पान ४ वर

## ११ लाख किमतीच्या ‘ग्रेस’ नावाच्या मारवाडी घोडीची श्रीगोंदा प्रदर्शनात बाजी

### आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली ग्रेस

**दैनिक आकर्षण । प्रा. केशव कातोरे**

**श्रीगोंदा–** तालुका स्तरावर आयोजित पशु-पक्षी प्रदर्शनात ‘ग्रेस’ नावाच्या २० महिन्यांच्या मारवाडी जातीच्या देखण्या घोडीने प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सुमारे ११ लाख रुपये किमतीची ही घोडी संपूर्ण प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण व केंद्रबिंदू ठरली.



ही घोडी शेखर बाळासाहेब लगड, रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांच्या मालकीची असून उत्कृष्ट बांधा, आकर्षक ठेवण आणि उत्तम संगोपनामुळे परीक्षकांनी ‘ग्रेस’ या घोडीची प्रथम क्रमांकासाठी निवड केली.

प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांनी ‘ग्रेस’ घोडीचे विशेष कौतुक केले. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील या मारवाडी घोडीची सर्वत्र चर्चा होत आहे.

होत आहे.तालुका स्तरावर आयोजित पशु-पक्षी प्रदर्शनात ‘ग्रेस’ नावाच्या २० महिन्यांच्या मारवाडी जातीच्या देखण्या घोडीने प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सुमारे ११ लाख रुपये किमतीची ही घोडी संपूर्ण प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण व केंद्रबिंदू ठरली.

ही घोडी शेखर बाळासाहेब लगड, रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांच्या मालकीची असून उत्कृष्ट बांधा, आकर्षक ठेवण आणि उत्तम संगोपनामुळे परीक्षकांनी ‘ग्रेस’ या घोडीची प्रथम क्रमांकासाठी निवड केली.

प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांनी ‘ग्रेस’ घोडीचे विशेष कौतुक केले. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील या मारवाडी घोडीची सर्वत्र चर्चा होत आहे.

## विकासाच्या वाटचालीत आणखी एक पाऊल

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील क्रीडाप्रेमी युवकांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली असून तालुक्यात आधुनिक सुविधांनी युक्त क्रीडा संकुल उभारण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या क्रीडा संकुलासाठी सुमारे ३०२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुर्वी १०० लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून आता ४ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याची माहिती आ. दाते यांनी दिली.

याबाबत बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ‘‘पारनेर तालुक्यातील युवकांमध्ये क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळविण्याची प्रचंड क्षमता आहे. मात्र योग्य सुविधा आणि प्रशिक्षणाच्या अभावामुळे अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी मिळत नव्हती. त्यामुळे क्रीडा समिती तयार झाल्याबरोबर लगेच तालुक्यात असलेल्या क्रीडा संकुलाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मांडला होता. शासनाने त्यास मान्यता दिल्याने तालुक्यातील युवकांसाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या क्रीडा संकुलामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळून भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर पारनेर तालुक्याचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू घडतील, असा विश्वास आहे.’’



आ. दाते म्हणाले, ‘‘क्रीडा क्षेत्राला चालना देणे ही काळाची गरज आहे. युवकांना क्रीडा आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळविण्यासाठी अशा सुविधा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पारनेर तालुक्यात क्रीडा विकासासाठी पुढील काळातही आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील.’’ महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या माध्यमातून या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावित क्रीडा संकुलामध्ये अत्याधुनिक इनडोअर हॉल, विविध क्रीडा प्रकारांसाठी मैदाने, व्यायामशाळा, योगा हॉल, स्वच्छतागृह तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे पारनेर तालुक्यातील युवकांना आधुनिक आणि दर्जेदार क्रीडा सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. क्रीडा संकुल उभारण्यास मंजूरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री व पालकमंत्री यांचे तालुक्यातील जनतेच्या वतीने खुप आभार! आमदार दाते सर यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने तालुक्यातील युवक, क्रीडाप्रेमी आणि पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या क्रीडा संकुलाच्या उभारणीमुळे पारनेर तालुक्यातील युवकांना विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण घेण्यासाठी अत्याधुनिक सुविधा मिळणार आहेत. स्थानिक पातळीवर क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासही चालना मिळणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे तालुक्यात क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तालुक्यातील क्रीडाप्रेमी युवक, क्रीडा संघटना तसेच ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले असून आमदार दाते यांच्या प्रयत्नांमुळे पारनेर तालुक्याच्या क्रीडा विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## सीना मध्यम प्रकल्पातून आजपासून उन्हाळी आवर्तन सुरू – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून सीना मध्यम प्रकल्पातून दि.१६ मार्च २०२६ पासून उन्हाळी आवर्तन सोडण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मे २०२५ मध्ये अवकाळी पावसामुळे सीना नदीची उपनदी असलेल्या वाळूंबा नदीस आलेल्या पुरामुळे सीना मध्यम प्रकल्प जून २०२५मध्ये पूर्ण क्षमतेने भरला होता.सप्टेंबर २०२५मध्ये झालेल्या अतिवृष्टीने रब्बी हंगामात पाण्याची मागणी झाली नाही.मात्र मार्च २०२६ मध्ये उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याने सीना मध्यम प्रकल्पाच्या माही जळगाव भागातून उन्हाळी आवर्तन सोडण्याची मागणी या भागातील शेतकऱ्यांनी जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी यांना भेटून केली होती.



सीना मध्यम प्रकल्पा मध्ये उपलब्ध असलेला पाणी साठा विचारात घेवून १६मार्च २०२६पासून आवर्तन सोडण्याच्या सूचना कुकडी सिंचन प्रकल्पाच्या अधिक्षक अभियंता श्रीमती अलका अहीरराव कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे यांना देण्यात आल्या आहेत.

रब्बी आवर्तनाचा कालावधी आताच संपला असतांना केवळ शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून उन्हाळी आवर्तन सोडण्याचा निर्णय झाला असला तरी भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेवून आवर्तन कालावधीत पाण्याचा अपव्यय कुठेही होणार नाही याची दक्षता अधिकार्यांनी घेण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

अलनिनोच्या संदर्भात हवामान विभागाने धोक्याचा इशारा दिला असल्याने जिल्ह्यातील धरणामध्ये असलेल्या पाणी साठा जपून वापरावा लागणार असल्याचा विचार करून अधिकार्यांनी सर्वच धरणा मधील पाण्याबाबत संवेदनशीलतेने दक्षता घेण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

**CHANGE IN NAME**
Old name
**KATHED SANJAYKUMAR SHRIMAL**
Changed as
New Name
**SANJAY SHRIMAL KATHED**
**Addhar No.**
**580605207660**

## दै. आकर्षण निवडक

### रोहयोच्या शिवपानंद रस्ते कामात गैरव्यवहाराचा आरोप

**अहिल्यानगर- जिल्हा परिषद अंतर्गत पारनेर पंचायत समितीच्या हद्दीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (रोहयो) सुरू असलेल्या शिवपानंद रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. बोगस मजूर दाखवून व नियमबाह्य पद्धतीने कामे दाखवत अनेक कामांची बिले काढण्यात आल्याची तक्रार अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात विभागीय स्तरावर चौकशी समिती स्थापन करून संपूर्ण कागदपत्रांची आणि प्रत्यक्ष कामांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत रोहयोच्या शिवपानंद रस्ते कामांची कोणतीही बिले अदा करू नयेत, अशी मागणी समितीच्या वतीने नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, पारनेर पंचायत समिती अंतर्गत विविध ग्रामपंचायतींमध्ये रोहयो योजनेंतर्गत शिवपानंद रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मात्र या कामांमध्ये रोजगार सेवक व ठेकेदार यांनी संगनमत करून बोगस मजूर दाखवण्याचा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही मजूर वयोवृद्ध असतानाही त्यांना कामावर दाखवण्यात आले आहे, तर काही मजूर इतर ठिकाणी काम करत असतानाही त्यांच्या नावांची नोंद मस्टर यादीत करण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.**

### आल्हाट यांना 'कस्तुरबा गांधी समाजसेवा पुरस्कार जाहीर



**अहिल्यानगर- येथील सामाजिक कार्यकर्त्या, साहित्यिक व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांची राज्यस्तरीय 'श्रीमती कस्तुरबा गांधी समाजसेवा पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. जळगाव येथील तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीतर्फे हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे वितरण २९ मार्च रोजी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख यांनी दिली आहे. सरोज आल्हाट गेल्या सुमारे ३० वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांमधून पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. समाजातील दलित, शोषित, दारिद्र्यग्रस्त, आदिवासी, बालकल्याण, परित्यक्ता महिला, युवकांचे प्रश्न, एड्सग्रस्त रुग्ण, कुष्ठरुग्ण, अंध तसेच इतर वंचित घटकांसाठी त्यांनी सातत्याने सामाजिक, विकासात्मक आणि धोरणात्मक स्तरावर काम केले आहे.**

### शिक्षिका सुरेखा ससे यांचे अल्पशा आजाराने निधन




**अहिल्यानगर- मुकुंदनगर येथील डॉ. जाकीर हुसेन मराठी प्राथमिक शाळा व मरहुम अल्ताफ इब्राहिम माध्यमिक विद्यालयातील शिक्षिका सुरेखा सोपान ससे (वय वर्षे ४०) यांचा नुकताच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे ससे कुटुंबीयांनी मरणोत्तर देहदान केले.त्या गुलमोहर रोड पोलीस चौकी येथील स्वामी समर्थ मंदिरा जवळ वास्तव्यास होत्या. शाळेत स्व. सुरेखा ससे यांना विद्यार्थी व शिक्षकांनी श्रध्दांजली वाहिली. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, बहिण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.**

# रोबोटिक्समध्ये आबासाहेब काकडे विद्यालयाच्या श्रेयस डमाळचा भारतात चौथा क्रमांक

### अटलप संस्थेकडून ५० हजारांचे सेन्सर किट प्रदान; विद्यालयात भरले रोबोटिक्स प्रदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव –** तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी आता जागतिक स्तरावरील कौशल्ये आत्मसात करत आहेत. शेवगाव येथील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कु. श्रेयस डमाळ याने अटलप संस्थेच्या माध्यमातून आयोजित रोबोटिक्स कोर्समध्ये संपूर्ण देशात चौथा क्रमांक पटकावून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमात सहभागी शाळांच्या क्रमवारीत आबासाहेब काकडे विद्यालय देखील भारतात चौथ्या स्थानावर झळकले आहे.

**विशेष मार्गदर्शन आणि नियोजन:**
विद्यालयातील या उपक्रमासाठी आणि विद्यार्थ्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत तसेच विज्ञान शिक्षिका राघिणी लबडे हे विशेष परिश्रम घेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी रोबोटिक्समधील नवनवीन प्रयोग यशस्वीरित्या पूर्ण करत आहेत. श्रेयसने मिळवलेले हे यश म्हणजे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांचा सुरेख संगम आहे.

विद्यालयाचा विशेष उपक्रम: ५ वी ते १२ वी साठी रोबोटिक्स कोर्स आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयात इयत्ता ५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स स्पेशल कोर्स सुरू करण्यात आला आहे. या आधुनिक कोर्सचा फायदा शेकडो विद्यार्थ्यांना होत असून, श्रेयस डमाळने मिळवलेले यश हे याच दर्जेदार प्रशिक्षणाचे फळ आहे.

रोबोटिक्स प्रदर्शन

श्रेयसच्या या यशाच्या पार्श्वभूमीवर, नुकतेच दोन दिवसांपूर्वी विद्यालयात एक विशेष रोबोटिक्स प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध रोबोटिक मॉडेल्स आणि प्रकल्प सादर करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा उत्स्फूर्तपणे आनंद घेतला.

**५० हजार रुपयांचे सेन्सर किट प्रदान**

अटलप संस्थेच्या ॲपवर श्रेयसने २२ हून अधिक प्रमाणपत्रे मिळवत आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. त्याची दखल घेत संस्थेने त्याला एकूण ५० हजार रुपयांचे दोन अत्याधुनिक सेन्सर किट बक्षीस म्हणून पाठवले आहेत. आज विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, पर्यवेक्षक सुनील आव्हाड आणि लक्ष्मण गाडे यांच्या हस्ते श्रेयसला हे किट प्रदान करून गौरवण्यात आले. त्यातील एक किट त्याने विद्यालयास भेट दिली आहे.

मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव:
या दैदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे प्रमुख डॉ. ॲड. विद्याधरजी काकडे, सहप्रमुख सौ. हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ आणि विश्वस्त पृथ्वीसिंगभैय्या काकडे यांनी श्रेयसचे कौतुक केले.

तसेच शालेय शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदना पुजारी, श्री. अशोक आहेर, प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रवींद्र आगळे, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर व विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी श्रेयसवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. या यशात शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.



अहिल्यानगर येथे नवाने रजू झालेले प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिवाजी कचरे अध्यक्ष श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थान व साई बाबा संस्था शिर्डी यांचे स्वागत व सन्मान करताना मोहटादेवी विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर.

# विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग तांत्रिक कौशल्य, सर्जनशीलता व नवकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला ‘‘ २.०’’ तंत्रज्ञान महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. तीन दिवसीय महोत्सवात ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली तांत्रिक क्षमता, सर्जनशीलता आणि नवकल्पना सादर केल्या.

दरवर्षी आयोजित करण्यात येणारा हा तंत्रज्ञान महोत्सव विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील कौशल्य दाखविण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. ‘‘कोड, कंपीट अँड कॉनकुअर‘‘ या संकल्पनेवर आधारित या महोत्सवातून विद्यार्थ्यांना कोडींग, सॉफ्टवेअर निर्मिती, सर्जनशील डिझाईन, प्रकल्प सादरीकरण, तांत्रिक स्पर्धा तसेच विविध उपक्रमांद्वारे आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळाली. कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन स्टुडन्ट असोसिएशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला हा महोत्सव विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, तांत्रिक विचारसरणी आणि नवनवीन तंत्रज्ञानाशी जोड निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

या महोत्सवात विविध आकर्षक आणि रोमांचक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये बग ऑक्शन , टेक ट्रेझरर , प्रकल्प स्पर्धा, बॉक्स क्रिकेट स्पर्धा , मिस्टरी गेम , ई-क्रीडा स्पर्धा, प्रॉम्प्ट शो डाऊन ट्रेझरर हंट अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कोडींग कौशल्य, सर्जनशीलता, तांत्रिक विचारशक्ती आणि समूहकार्याची कसोटी लागली. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महोत्सवाचे उद्घाटन तांत्रिक संचालक प्रा. सुनिल कल्हापुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी तांत्रिक प्रयोग, संशोधन आणि नवकल्पना यावर भर दिला पाहिजे. अशा प्रकारचे तंत्रज्ञान महोत्सव विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देतात आणि त्यांच्या नेतृत्वगुणांना व समस्या निराकरण क्षमता विकसित होते . ‘‘कोड, कंपीट अँड कॉनकुअर ‘‘ ही संकल्पना विद्यार्थ्यांना केवळ स्पर्धेत जिंकण्यासाठी नाही तर जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरित करणारी आहे. भविष्यातील तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडी घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने शिकत राहणे आणि नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगणक विज्ञान व डिझाईन विभागप्रमुख डॉ. रविंद्र तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.पूजा काजळे यांनी शिक्षक समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही नियोजनबद्ध पद्धतीने काम करत हा महोत्सव यशस्वी केला.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, तांत्रिक संचालक प्रा. सुनिल कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील,संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

तंत्रज्ञान, नवकल्पना आणि सर्जनशीलतेचा संगम घडविणारा २.० महोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यातही अशा उपक्रमांमधून तरुण पिढीला नवे तांत्रिक क्षितिज गाठण्याची प्रेरणा मिळत राहील.असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी उदय अनभुले यांची निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मराठा सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सर्वानुमते उदय अनभुले यांची पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे पतसंस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

बैठकीस संस्थेचे संस्थापक चेअरमन इंजि विजयकुमार ठुबे, मावळते व्हाईस चेअरमन बाळकृष्ण काळे, संचालक ज्ञानदेव पांडुळे, किशोर मरकड, राजश्री शितोळे, सतीश इंगळे, प्रा. किसनराव पायमोडे, यशवंत शिंदे, ॲड. काशिनाथ डोंगरे, संभाजी मते, द्वारकाधीश राजे भोसले, बाळासाहेब सोनाळे, प्रा. डॉ. कल्पना ठुबे, ॲड. राजेश कावरे, अच्युत गाडे, इंजि. रामदास काळदाते आदी संचालक उपस्थित होते.

निवड जाहीर झाल्यानंतर संस्थापक चेअरमन इंजि. विजयकुमार ठुबे यांच्या हस्ते नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन उदय अनभुले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना संस्थापक चेअरमन इंजिनिअर विजयकुमार ठुबे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेचे संपूर्ण जिल्ह्यात विस्तृत जाळे निर्माण झाले आहे. संस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक पद्धतीने चालविला जात असून सभासदांचा विश्वास हीच आमची सर्वात मोठी ताकद आहे. संचालक मंडळाच्या एकजुटीमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या परिश्रमामुळे पतसंस्था सातत्याने प्रगतीच्या मार्गावर आहे. पुढील काळातही विविध लोकहितकारी उपक्रम राबवून पतसंस्थेला अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी नमूद केले.

नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन उदय अनभुले यांनी आपल्या मनोगतात संस्थापक आणि संचालक मंडळाने दिलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, पतसंस्थेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक व कर्मचारी यांच्या सहकार्याने अधिक जोमाने काम करण्यात येईल. सभासदांच्या विश्वासाला पात्र ठरून त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना राबविण्यावर भर दिला जाईल. संस्थेच्या कार्यात पारदर्शकता आणि विश्वासार्हता जपणे हीच आमची प्राथमिकता असेल, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

तसेच पतसंस्थेचे सहाय्यक व्यवस्थापक बबनराव सुपेकर, शाखाधिकारी अनुपमा भापकर, पुष्पा इंगळे, कविता ढोणे, प्रशांत बोरुडे, मनीष रोहकले आदी उपस्थित होते.

## रमजानच्या पार्श्वभूमीवर ईदगाह मैदानाची स्वच्छता; नगराध्यक्ष भूषण कावसनकर यांचा पुढाकार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना काही दिवसांवर येऊन ठेपला असून नमाज पठणासाठी पैठण येथील नाथसागराच्या पायथ्याशी असलेल्या ईदगाह मैदानाची स्वच्छता करण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्ष भूषण कावसनकर यांनी स्वतः उपस्थित राहून कामाचा आढावा घेत साफसफाई करून घेतल्याने मुस्लिम समाजातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

रमजान महिन्यात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव ईदगाह मैदानावर एकत्र येऊन नमाज अदा करतात. त्यामुळे मैदान परिसर स्वच्छ व सुस्थितीत राहावा, यासाठी नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगराध्यक्ष कावसनकर यांनी स्वतः मैदानावर उभे राहून सफाई कामगारांकडून साफसफाई करून घेतली. या उपक्रमामुळे रमजान महिन्यात नमाज पठणासाठी येणाऱ्या मुस्लिम बांधवांना स्वच्छ व सुयोग्य व्यवस्था उपलब्ध होणार असल्याने मुस्लिम समाजाने नगराध्यक्षांच्या या पुढाकाराचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.

# पद हे दाखवायचे नसून ती जबाबदारी - अक्षय कर्डिले

### मजले चिंचोली येथे 'विजयाचा संकल्प मेळावा' उत्साहात । भाजप युवा नेते अक्षय कर्डिले यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लवकरच होण्याची शक्यता असताना मजले चिंचोली येथे ग्रामस्थांच्या वतीने 'विजयाचा संकल्प मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. पांगरमल, घोसपुरी, आव्हाडवाडी, साकेवाडी, उदरमल या परिसरातील ग्रामस्थांच्या सहभागाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन वैभव ढाकणे यांनी केले होते. यावेळी भाजपाचे युवा नेते अक्षय कर्डिले यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रा. माणिकराव विधाते, संदीप कर्डिले, नगरसेवक सुरेश बनसोडे, जेऊरचे सरपंच आदिनाथ बनकर, बंडू पवार, मजले चिंचोलीचे सरपंच अमित आव्हाड, धर्मनाथ आव्हाड, बी. वाय. आव्हाड, हरिदास कदम, भाऊराव ढाकणे, खोसपुरीचे माजी सरपंच सोमनाथ हारेर, बाबा शेख, भीमानाना आव्हाड, पांगरमलचे सरपंच अमोल आव्हाड, बाप्पू आव्हाड, भीमराज आव्हाड, आव्हाडवाडीचे सरपंच तुकाराम आव्हाड, डोंगरवाडीचे सरपंच उद्धव गिते, रामकिसन आव्हाड आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना अक्षय कर्डिले म्हणाले की, माझे वडील स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी गेली जवळपास ३० वर्षे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. सकाळी सात वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत ते मतदारसंघातील गावागावात फिरत असत. शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात 'कामाचा माणूस' अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. आजही मतदारसंघात फिरताना जनता त्यांच्या आठवणींना उजाळा देते आणि त्यांच्याबद्दलचे प्रेम व्यक्त करते.

त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करणार आहे. पद हे दाखवायचे नसून ती एक मोठी जबाबदारी असते, या भावनेतून नागरिकांची सेवा करण्याचा माझा प्रयत्न राहील. स्वर्गीय कर्डिले यांनी कुटुंबापेक्षा जनतेत राहणे पसंत केले. जनतेचे प्रश्न सोडविणे हीच त्यांची खरी आवड होती. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी मी काम करणार आहे. कर्डिले कुटुंबाचे जनतेशी स्नेहबंध जुळले असून आगामी विधानसभा पोटनिवडणूक पूर्ण ताकदीने लढवायची आहे. मतदारसंघातील दूध व्यवसायिक, शेतकरी, अंगणवाडी सेविका, बचत गट यांसारख्या घटकांच्या प्रश्नांना स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी नेहमीच प्राधान्य दिले होते.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

# पोलीस दादांवर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ?



अहिल्यानगर - पोलीस कर्मचारी देविदास शेंडे या 'पोलीस दादा' यांच्यावर बेकायदेशीर सावकारी तसेच शुभम शिंदे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल न करता कारवाई टाळली जात असल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देविदास शेंडे यांच्या बेकायदेशीर सावकारीच्या प्रकरणात तसेच शुभम शिंदे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतरही संबंधितांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपी मोकाट फिरत असल्याचा आरोप रिपब्लिकन सेनेने केला आहे. या प्रकरणात तातडीने गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. दरम्यान, वैशाली विशाल निमसे व विशाल मारुती निमसे यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भातही अनेकदा जिल्हा पोलीस अधीक्षक व पोलीस उपअधीक्षक यांना भेटून निवेदने देण्यात आली होती. १६ फेब्रुवारी २०२५ रोजीही पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन कारवाईची मागणी करण्यात आली होती; मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.तसेच २७ डिसेंबर २०२५ रोजी शुभम शिंदे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असूनही सुमारे अडीच ते तीन महिने उलटूनही आरोपींना अटक करण्यात आलेली नाही, अशी नाराजीही व्यक्त करण्यात आली.या सर्व प्रकरणांबाबत न्याय मिळावा यासाठी १६ मार्च २०२६ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा पीडितांसह रिपब्लिकन सेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# अहिल्यानगरात १९ मार्चला ''ग्लोबल ब्रेन ड्रेन'' आंदोलन

अहिल्यानगर - जगभर वाढत चाललेल्या युद्ध आणि संघर्षांच्या पार्श्वभूमीवर मानवतेच्या रक्षणासाठी आणि मध्यपूर्वेतील युद्ध तातडीने थांबवण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर शहरात ''ग्लोबल ब्रेन ड्रेन'' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १९ मार्च रोजी दिल्ली गेट परिसरात हे आंदोलन होणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. ॲड. गवळी यांनी सांगितले की, सध्या मध्यपूर्व आणि आखाती प्रदेशात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर निरपराध नागरिकांचा बळी जात असून लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागत आहे. याशिवाय नैसर्गिक संपत्ती, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि मानवी विकासावरही गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.युद्धामुळे मानवी प्रगतीला मोठा धक्का बसत असून विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या माध्यमातून निर्माण झालेली मानवी क्षमता विनाशाच्या दिशेने वळत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर जागतिक शांततेचा संदेश देण्यासाठी आणि युद्धविरोधी भूमिका ठामपणे मांडण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी ॲड. गवळी म्हणाले की, युद्ध आणि संघर्षांमुळे केवळ मानवी जीवितहानीच होत नाही, तर मानवी बुद्धिमत्ता, संशोधनशक्ती आणि ज्ञानसंपत्तीचाही मोठ्या प्रमाणावर नाश होतो. जगातील वैज्ञानिक, तंत्रज्ञ आणि बुद्धिजीवी वर्गाने निर्माण केलेली प्रचंड क्षमता युद्धासाठी वापरली जात असल्यामुळे मानवजातीच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण होतो. ''मानवी बुद्धिमत्ता आणि विज्ञान हे विनाशासाठी नव्हे, तर मानवकल्याणासाठी वापरले गेले पाहिजे. युद्धामुळे होणारा ज्ञानसंपत्तीचा नाश म्हणजेच 'ग्लोबल ब्रेन ड्रेन' होय,'' असे त्यांनी स्पष्ट केले. मानवजातीचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी संपूर्ण जगाने विवेकाधारित आणि जबाबदार जागतिक शासनव्यवस्था स्वीकारणे आवश्यक असल्याचे ॲड. गवळी यांनी सांगितले. त्यांच्या मते, आजच्या काळात केवळ आर्थिक किंवा तांत्रिक प्रगती पुरेशी नाही.

# आनंदऋषिजी नेत्रालयात ८ ते १४ फेब्रुवारी दरम्यान काचबिंदू जनजागृती सप्ताह संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ८ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत आनंदऋषिजी नेत्रालयात ग्लॉकोमा जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने रुग्ण व नागरिकांमध्ये ग्लॉकोमा या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

नेत्रालयातील पूर्णवेळ ग्लॉकोमा तज्ज्ञ डॉ. संदीप राणे व डॉ. मिसबाह शेख यांनी ग्लॉकोमा या आजाराविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ग्लॉकोमा हा ''दृष्टी चोरणारा निःशब्द आजार''असून सुरुवातीला कोणतीही स्पष्ट लक्षणे जाणवत नाहीत. त्यामुळे वेळेवर तपासणी व नियमित फॉलोअप केल्यास दृष्टीचे कायमचे नुकसान टाळता येऊ शकते. विशेषतः ४० वर्षांवरील नागरिकांनी नियमित डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आनंदऋषिजी नेत्रालयात ग्लॉकोमा निदानासाठी यांसारख्या अत्याधुनिक तपासणी सुविधा अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत. तसेच सारखे आधारित उपचारही येथे उपलब्ध आहेत.

ग्लॉकोमावरील सर्व शस्त्रक्रिया आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ८६८६४०१५१५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नेत्रालयाच्या वतीने प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड करण्यात आले.

# गोदावरी नदीपात्रात वाळू उपसा; दोन ट्रॅक्टरसह ५.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीररीत्या वाळूचा उपसा करून वाहतूक करण्याचा प्रकार उघडकीस आला असून पैठण पोलिसांनी कारवाई करत दोन ट्रॅक्टरसह सुमारे ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र पोलिसांना पाहून आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास पैठण तालुक्यातील नायगाव शिवारातील गोदावरी नदीपात्राच्या काठावर काहीजण ट्रॅक्टरच्या सहाय्याने बेकायदेशीररीत्या वाळूचा उपसा करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.



दरम्यान, पोलिसांची चाहूल लागताच आरोपी भैय्या पांडव (पूर्ण नाव अज्ञात, रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर) व शाहरुख (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात) हे दोघे घटनास्थळावरून पळून गेले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता तेथे स्वराज कंपनीचे निळ्या रंगाचे विना नंबरचे ट्रॅक्टर तसेच महिंद्रा सरपंच कंपनीचे लाल रंगाचे विना नंबरचे ट्रॅक्टर, त्यासोबत लोखंडी यारी व केनी तसेच अंदाजे एक ब्रास वाळू असा मुद्देमाल आढळून आला.

पोलिसांनी दोन्ही ट्रॅक्टरसह साहित्य जप्त केले असून एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणी लक्ष्मण शामबुवा पुरी (वय ४२), पोलीस हवालदार, पोलीस ठाणे पैठण यांच्या फिर्यादीवरून गुरनं ००८८/२०२६ अन्वये कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता तसेच गौण खनिज कायद्यानुसार कलम २१ (१) ते (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस हवालदार चेडे यांनी दाखल केली असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आटोळे करीत आहेत. दरम्यान फरार आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी दिली.

### अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वप्रथम टीईएल परीक्षेत

# पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ६२ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी, टीईएल परीक्षेत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वप्रथम पेमराज सारडा महाविद्यालयाच्या अंतर्गत परीक्षेत ६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून वाणिज्य विभागासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

प्राचार्यांनी आपल्या मनोगतात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे त्याचबरोबर प्राध्यापकांचे कौतुक केले.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे तसेच प्रबंधक अशोक असेरी,सीए अभय कटारिया आणि सीए प्रसाद पुराणिक उपस्थित होते. तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ. रमेश झरकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पेमराज सारडा महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली. असून तिच्या भावी कारकिर्दीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.प्रिया सारडा,प्रा.वीरेंद्र पाटील, प्रा.ओंकार भिंगारदिवे, प्रा.साक्षी अरोरा, प्रा.वरद

# न्यू लॉ कॉलेजमध्ये १९ वी कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन

### कॉ. बापूसाहेब भापकरांचे विचार समाजाला पुढे नेणारे दिशादर्शक – कॉ. सुभाष लांडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कॉ. बापूसाहेब भापकर यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. समाजात निरोगी सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांची आज विशेष गरज आहे. भापकरांचे कार्य व विचार समाजाला पुढे नेण्यासाठी दिशादर्शक ठरणारे आहेत, असे प्रतिपादन भाकपचे राज्यसचिव कॉ. सुभाष लांडे यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये आयोजित १९ व्या कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पा. होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, प्राचार्या डॉ. एम. एम. तांबे, ॲड. सुभाष भोर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



कॉ. लांडे पुढे म्हणाले की, आजच्या काळात माणसे अधिक आत्मकेंद्रीत होत आहेत. नव्या पिढीने केवळ मतदानापुरते राजकारण न पाहता व्यापक सामाजिक दृष्टीकोन ठेवून समाजासाठी काम करण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात ॲड. विश्वासराव आठरे पा. म्हणाले की, भारतात गरीब–श्रीमंत दरी वाढत असून कष्टकरी व शेतकरी वर्गाला पुढे आणण्यासाठी कॉ. बापूसाहेब भापकरांचे विचार समाजात रुजविणे आवश्यक आहे. या देशात वैचारिक चळवळ निर्माण करून सर्वसामान्यांच्या हितासाठी तरुण वर्गाने, विशेषतः वकिलांनी, पुढाकार घेऊन सामाजिक बदल घडवून आणावा.

कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्या डॉ. एम. एम. तांबे यांनी केले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी स्पर्धेचा आढावा घेत स्पर्धेचा दर्जा वर्षागणिक उंचावत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कॉ. बापूसाहेब भापकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. पाहुण्यांची ओळख प्रा. डी. बी. मोरे यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खूळे–कांडेकर यांनी केले तर आभार प्रा. पूनम वडडेपल्ली यांनी मानले.

या स्पर्धेसाठी राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील महाविद्यालयांचे स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या अधीक्षक हेमा कदम, प्रा. अनुराधा मते, प्रा. अतुल म्हस्के, ग्रंथपाल प्रा. सौरभ साबळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपतींच्या नावाला साजेसे काम शिबिरातून व्हावे - आमदार विठ्ठलराव लंघे

### नेवासा फाटा येथे महाराजस्व शिबिरास प्रतिसाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** शासनाचे प्रत्येक निर्णय लोकाभिमुख आहेत. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी वरदान ठरणारे आहे. मात्र, यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची साथ महत्त्वाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला साजेसे काम या महाराजस्व समाधान शिबिरातून व्हावीत अशी अपेक्षा आमदार विठ्ठलराव लंघे यांनी व्यक्त केली.

नेवासा फाटा (ता. नेवासा) येथे भानसहिवरे मंडल आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजनाने आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते व भूसंपादनचे उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक संदीप गोसावी, नायब तहसीलदार संदीप चिंतामणी, प्रशांत गोसावी, पुरवठा अधिकारी सुदर्शन दुर्योधन, सरपंच सतीश निपुंगे, सरपंच किशोर जोजार, सरपंच शरद आरगडे, सरपंच भिवाजी आघाव, निवृत्ती काळे, गोरखनाथ कोतकर, भाजपचे ज्ञानेश्वर पेचे, तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, अंकुश काळे, धरणग्रस्त नेते दिगंबर आवारे यांच्या उपस्थित झाले.

याप्रसंगी बोलतांना उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी म्हणाले, कामात दिरंगाई आणी चुकीची कामे खपवून घेतली जाणार नाहीत. शासनाच्या प्रत्येक योजना व उपक्रमाची नियोजनबद्ध अमलबजावणी झाली पाहिजे. जनतेची कामे वेळेत करून ती मार्गी लावण्याचे आवाहनही त्यांनी केले.

स्वागत तहसीलदार डॉ संजय बिरादार यांनी तर प्रास्ताविक मंडलाधिकारी सरिता मुंडे यांनी केले. यावेळी आमदार लंघे यांच्या हस्ते उपस्थित विविध लाभार्थींना विविध दाखले व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. भानसहिवरे, खुणेगाव, मुकिंदपूर, मक्तापूर, पिचडगाव, सौंदाळा, नागपूर, उस्थळदुमाला, हंडीनिंमगाव, बाभुळवेढा, रांजणगाव, कारेगाव या भानसहिवरे मंडळातील गावांतील शेतकरी, नागरिक, विद्यार्थ्यांनी अशा सुमारे ३९२ लाभार्थ्यांनी शिबिराचा शिबिरस्थळी लाभ घेतला आहे. सूत्रसंचालन डॉ. रेवणनाथ पवार यांनी केले.

## आ. लंघेंकडून नियोजनाचे कौतुक

**दरम्यान शिबिर उद्घाटन प्रसंगी शिबिराचे उत्कृष्ट नियोजन, येथील सुविधा याबाबत आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यासह उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, तहसीलदार डॉ संजय बिरादार यांनी आपल्या भाषणात शिबिराचे आयोजक मंडलाधिकारी सरिता मुंडे यांच्यासह आकाश जोशी, श्वेता काळे, रमेश रिंढे, अशोक गाडेकर, सोमनाथ गलांडे या भानसहिवरे मंडळातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे कौतुक केले.**

## दाखले, प्रमाणपत्रे , सातबारा असे झाले वाटप

**उत्पन्न दाखले १४, संजय गांधी योजना २५, शिधा पत्रिका वाटप ०७, जिवंत सातबारा योजना २५, पोटखराबा लागवड ०५, रहिवासी दाखले १०, फेरफार निकाली काढणे २३, डिजिटल ७/१२ वितरित १२३, डिजिटल ८-अ वितरित, ११४, एक खिडकी योजना अंतर्गत ४२, फाळणी (जमिनीचे पोटहिस्से) लाभार्थी ०२, भोगवटदार वर्ग दोनचे- वर्ग एकमध्ये रूपांतर ०२ असे एकूण ३९२ लाभार्थ्यांना विविध दाखले, प्रमाणपत्रे, सातबारे वितरित करण्यात आले आहेत.**

# शिक्षणच उज्ज्वल भवितव्याची गुरुकिल्ली – प्रसाद शिंदे

### आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीवर मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो तसेच जीवनात योग्य दिशा मिळते. ''विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात मोठे ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. मेहनत, शिस्त आणि जिद्द यांच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते,'' शिक्षणच उज्ज्वल भवितव्याची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन शिक्षक नेते प्रसाद चंद्रभान शिंदे यांनी केले.



पळशी (ता. पारनेर) येथील आश्रम शाळेत विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रसाद शिंदे बोलत होते. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मंगेश शिंदे, नामदेव जाधव, शाळेचे मुख्याध्यापक अनिल हिंगडे आणि शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रसाद शिंदे यांचा शाळेचे मुख्याध्यापक हिंगडे यांनी सत्कार केला.

पुढे बोलताना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे आशीर्वाद आणि स्वतःची मेहनत यांच्या आधारे विद्यार्थी उज्ज्वल भविष्य घडवू शकतात, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# संत एकनाथ साखर कारखाना कामगारांच्या थकीत पीएफसाठी खासदारांचा दिल्ली दरबारात पाठपुरावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील संत एकनाथ सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या थकीत भविष्य निर्वाह निधी (पी.एफ.) प्रश्नाबाबत जालना व छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील खासदारांनी दिल्लीपर्यंत पाठपुरावा केला आहे. खासदार डॉ. कल्याण काळे आणि संदिपान भुमरे पाटील यांनी दिल्ली येथील केंद्रीय पी.एफ. आयुक्तांना संयुक्त निवेदन देत कामगारांच्या थकीत पी.एफ.चा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली.

याबाबत प्रतिक्रिया देताना पैठण पंचायत समितीचे माजी उपसभापती व काँग्रेस नेते बाबासाहेब भाऊ पवार यांनी सांगितले की, संत एकनाथ कारखान्याच्या कामगारांचा पी.एफ. दीर्घकाळापासून थकीत आहे. या प्रश्नावर दोन्ही खासदारांनी



दिल्लीत जाऊन पाठपुरावा केल्यामुळे कामगारांना शंभर टक्के न्याय मिळेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

पवार यांनी पुढे सांगितले की, कामगारांच्या प्रश्नासाठी यापूर्वीही आवाज उठविण्यात आला होता. संत एकनाथ साखर कारखान्याच्या गेटसमोर सुमारे दहा वर्षांपूर्वी भजन आंदोलन करून या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले होते. त्या आंदोलनानंतरही हा प्रश्न प्रलंबित राहिला होता. मात्र आता दिल्ली स्तरावर झालेल्या या हालचालीमुळे कामगारांच्या न्यायासाठी सकारात्मक घडामोडी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, रमेश कृष्णमूर्ती (केंद्रीय कार्यालय सचिव) यांची दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन दोन्ही खासदारांनी लेखी निवेदन दिले. त्यात सचिन घायाळ शुगर मिल लि. या कंपनीकडून संत एकनाथ कारखान्यातील कामगारांचा भविष्य निर्वाह निधी दीर्घकाळापासून जमा करण्यात आलेला नसल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून लवकरात लवकर निर्णय होऊन कामगारांना त्यांच्या हक्काचा पी.एफ. मिळावा, अशी अपेक्षा कामगार व परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी - संजय राका

**। राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या स्मृतिदिनानिमित्त हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद । १०८ रुग्णांची तपासणी; अल्पदरात होणार शस्त्रक्रिया**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सध्या सर्वच वयोगटांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असून अनेक वेळा चालता-बोलता व्यक्तीचा अचानक मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत आहेत. अशा परिस्थितीत तत्पर व उच्च दर्जाची सेवा देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन संजय राका यांनी केले. वाढत्या हृदयविकाराच्या पार्श्वभूमीवर समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलमार्फत सुरु असलेली उत्कृष्ट आरोग्यसेवा देशभरात नावाजली गेल्याचे त्यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त श्रीमती बिजयाबाई मोहनलालजी राका परिवाराच्या वतीने आयोजित हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय राका, भारती राका, चंद्रकांत राका, अनिता राका, किरण राका, प्रितम राका, गौरव राका, सोनम राका, प्रिंकेश राका, दिव्यानी राका, अमोल राका, कोमल राका, शुभम राका, सायली राका, सौरभ राका, आदेश राका, ऐश्वर्या राका, रियान राका, मायरा राका, संतोष बोथरा, सुभाष मुनोत, महेंद्र कांकरिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा यांनी सांगितले की, दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा मिळत असल्यामुळे देशभरातून रुग्ण आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येत आहेत. हॉस्पिटलच्या स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून सेवाभावाने रुग्णसेवा सुरू आहे. औषधांसोबतच आचार्यजींच्या आशीर्वादाची दुवा मिळत असल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळतो. हॉस्पिटलचे हार्ट सर्जरी सेंटर देशभरात नावाजले गेले असून आतापर्यंत २५ हजारांहून अधिक बायपास सर्जरी, ५० हजारांपेक्षा जास्त अँजिओप्लास्टी आणि १ लाखाहून अधिक अँजिओग्राफी यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. याशिवाय लहान मुलांच्या ८ हजारांहून अधिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. पूर्वी महाराष्ट्रात हृदय शस्त्रक्रियेची केंद्रे कमी होती आणि त्याचा खर्चही सर्वसामान्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे समाजाची गरज लक्षात घेऊन या हॉस्पिटलमध्ये कार्डियाक सेंटर उभारण्यात आले. या विभागाचे आत्मा

# जिद्द, चिकाटी आणि कष्टानेच स्पर्धा परीक्षेत यश - पोलीस निरीक्षक उमेश परदेशी

**सनफार्मा विद्यालयात आर.एस.पी. छात्र सैनिकांचा गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच मोठे ध्येय समोर ठेवून जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याचा संकल्प करावा. मोबाईलचे तंत्रज्ञान केवळ ज्ञान संपादनासाठी वापरणे योग्य आहे; मात्र विद्यार्थ्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यास, मैदानी खेळ आणि व्यायाम यासाठी देण्याचे आवाहन राखीव पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी केले.

ग्रामीण विकास मंडळ संचलित सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर येथे महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग व शिक्षण विभागाच्या अंतर्गत आर. एस.पी. (छात्र सैनिक) पथकातील गुणवंत, शिस्तप्रिय व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष बबनराव कातोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात उमेश परदेशी बोलत होते.

परदेशी पुढे म्हणाले की, ज्या प्रकारे एखाद्या इमारतीचा पाया मजबूत असतो, तेव्हाच त्यावर अनेक मजले उभारता येतात; त्याचप्रमाणे शालेय जीवन हा विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाचा भक्कम पाया आहे. या काळात घेतलेले शिक्षण, घडलेले संस्कार आणि केलेली मेहनत यामुळेच पुढे कोणत्याही क्षेत्रात मोठे पद गाठता येते. आज अनेक पोलीस अधिकारी शालेय जीवनापासून अभ्यास आणि परिश्रम करतच उच्च पदावर पोहोचले आहेत, त्यांच्याकडून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष बबनराव कातोरे यांनी संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, ड्रिल इन्स्पेक्टर व सहाय्यक फौजदार नितीन मोरे, आबासाहेब घिगे, मंगेश दाभाडे तसेच संस्थेचे उपाध्यक्ष शांताराम गाडे, संचालक रावसाहेब सप्रे, सुदाम भोर, प्राचार्य रावसाहेब सातपुते आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते.

वाहतूक रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात आर.एस.पी. पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून विविध जनजागृती उपक्रम राबवले जातात. रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देणे, ट्राफिक सिग्नलवर वाहतुकीचे नियमन, यात्रा काळात पार्किंग व वाहतूक व्यवस्थापन, रस्त्यावरील सूचना फलकांचे प्रात्यक्षिक, वाहनधारकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगणे तसेच नियम तोडल्यास होणाऱ्या दंडाबाबत जागरूकता निर्माण करणे असे उपक्रम विद्यार्थ्यांकडून राबवले जात आहेत.

# मिलन बँक्वेट हॉलमधील प्रतिमांच्या कथित अवमानाबाबत महाराष्ट्र शासनाची हरियाणा सरकारकडे चौकशीची मागणी

**सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांच्या पाठपुराव्याची शासनाने घेतली दखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हरियाणा राज्यातील फरीदाबाद जिल्ह्यातील सिक्री येथे असलेल्या मिलन बँक्वेट हॉलमध्ये राष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांचा कथित अवमान झाल्याच्या प्रकरणी महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत हरियाणा राज्य सरकारच्या उपसचिवांना अधिकृत पत्र पाठविले आहे.

या संदर्भात शहरातील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने या तक्रारीची नोंद घेतली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव महेश वाव्हळ यांनी हरियाणा शासनाला पाठविलेल्या पत्राची प्रत वधवा यांना पाठवून माहिती देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी हरियाणा राज्यातील फरीदाबाद येथील सिक्री परिसरातील मिलन बँक्वेट हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा वापर स्वच्छतागृह दर्शक (टॉयलेट साइनबोर्ड) म्हणून केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर देशभरातून संतापाची लाट उसळली. राष्ट्राच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा अशा प्रकारे अवमान करण्यात आल्याचा आरोप करत अनेकांनी तीव्र निषेध व्यक्त केला.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी पुढाकार घेत औपचारिक तक्रार दाखल केली. त्यांनी हरियाणा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग आणि गृह विभाग यांना ई-मेलद्वारे तक्रार नोंदवली. या तक्रारीत संबंधित घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या संदर्भात हरियाणा शासनाला पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन अशा पद्धतीने करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे की त्यामुळे काही नागरिकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात किंवा ते अयोग्य वाटू शकते. जर या संदर्भातील अहवाल सत्य आढळले, तर या बाबीचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, कारण यामुळे सार्वजनिक ठिकाणी सामाजिक सौहार्द आणि सभ्यतेवर अनवधानाने परिणाम होऊ शकतो.

यामुळे या प्रकरणाची शक्य तितक्या लवकर चौकशी करून आवश्यक असल्यास योग्य ती तपासणी करण्यात यावी, अशी विनंती महाराष्ट्र शासनाने हरियाणा सरकारकडे केली आहे. तसेच, जर नियमांचे किंवा सार्वजनिक शिष्टाचाराचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले, तर भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी लागू असलेल्या तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**संस्कृत विषयातील उल्लेखनीय कार्यासाठी**

# प्रियंका पोळ यांना ‘उद्योगिनी पुरस्कार’



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ब्राह्मण बिजनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन () तर्फे स्व. गीता गोडबोले-घैसास स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा ‘उद्योगिनी पुरस्कार’ यंदा पोळ क्लासेसच्या संचालिका सौ.प्रियंका अभिजीत पोळ यांना प्रदान करण्यात आला. सर्व भाषांची जननी असलेल्या देवभाषा संस्कृत विषयाच्या प्रसारासाठी व शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला.

महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या कार्याची दखल घेणे या उद्देशाने संस्थेच्या वतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. विविध उद्योग व व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना या माध्यमातून सन्मानित करण्यात येते. यंदाच्या पुरस्कारासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून तब्बल ७० महिला उद्योजकांनी आपली नामांकने दाखल केली होती.

पुण्यातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व मान्यवर परीक्षकांच्या समितीमार्फत या नामांकनांची छाननी करण्यात आली. सर्व बाबींचा सखोल विचार करून अंतिम फेरीसाठी सात महिला उद्योजकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये प्रियंका अभिजीत पोळ यांची निवड विशेष ठरली. संस्कृत विषयाच्या अभ्यासाला चालना देणे, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतबद्दल आवड निर्माण करणे तसेच शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनवीन उपक्रम राबविणे या कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

या पुरस्काराचे स्वरूप रोख पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते. पुरस्कार स्वीकारताना सौ. प्रियंका पोळ यांनी हा सन्मान आपल्या गुरु स्व. पुष्पा नंदकुमार पोळ व कुटुंबीय आणि विद्यार्थ्यांना समर्पित करत भविष्यातही संस्कृत विषयाच्या प्रसारासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# महामानव बाबा आमटे संस्था संचालित प्रज्ञा गुरुकुल २ उपक्रमाचा यशस्वी समारोप

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा प्रयोग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात घुगलवडगाव येथे कार्यरत असलेली महामानव बाबा आमटे सामाजिक विकास सेवा संस्था गेल्या १७ वर्षांपासून अनंत झेंडे यांच्या माध्यमातून आदिवासी समाजातील मुलांसाठी निवासी वस्तीगृह चालवत आहे. या वस्तीगृहामध्ये विशेषतः आदिवासी पारधी समाजातील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. पारधी समाज हा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला समाज मानला जातो.



गुन्हेगारीचा ऐतिहासिक शिक्का, उदरनिर्वाहाची साधने नसणे आणि शिक्षणापासून दूर राहिलेली सामाजिक परिस्थिती यामुळे या समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येणे कठीण जाते ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन संस्थेमार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार आणि जीवनावश्यक कौशल्ये मिळावीत यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ‘‘प्रज्ञा गुरुकुल’’ हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या प्रज्ञा गुरुकुल २ या उपक्रमाचा नुकताच यशस्वी समारोप झाला. हा उपक्रम केवळ अभ्यासापुरता मर्यादित नसून आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तयार केलेला एक शैक्षणिक प्रयोग आहे. संस्थेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना गणित, भाषा आणि इतर विषयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, तसेच त्यांच्यामध्ये जीवनावश्यक कौशल्ये विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये प्रामुख्याने पुस्तकांतील अभ्यासावर भर दिला जातो. मात्र प्रज्ञा गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिकण्याची संधी देण्यात आली. प्रश्न विचारणे, प्रयोग करणे, चर्चेत सहभागी होणे आणि स्वतः विचार करून शिकणे या पद्धतींमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण झाली. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी डॉ. सपना सेठ, मयूर सेठ आणि डॉ. प्रकाश सेठ यांचे विशेष योगदान लाभले. तसेच कीरीटी मोरे आणि ज्योती एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प गेल्या दोन वर्षांपासून राबविण्यात येत आहे. उपक्रमाचे नियोजन, समन्वय आणि व्यवस्थापन यामध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. मागील वर्षी हा उपक्रम संस्थेत केवळ रविवारी आयोजित केला जात होता. मात्र यावर्षी त्यामध्ये महत्त्वपूर्ण बदल करून शिक्षक आणि स्वयंसेवक आठ दिवस निवासी स्वरूपात संस्थेत राहून विद्यार्थ्यांसोबत काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुण्यासारख्या महानगरातून ग्रामीण भागातील घुगलवडगाव येथे येऊन विद्यार्थ्यांसोबत राहून काम करणे हे आव्हानात्मक असतानाही शिक्षकांनी अत्यंत समर्पणाने ही जबाबदारी पार पाडली.

या उपक्रमामध्ये वंदना सोनटक्के आणि रुपाली स्वामी यांनी शिक्षक प्रशिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. प्राथमिक आणि माध्यमिक विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिकविण्यासाठी शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन त्यांनी दिले. तसेच धनश्री सोनवणे, सायली साठे, क्रिया मुथा, प्रीती एरंडे, रुपेश सरवदे, यश गडगिळे, वृषाली फडतरे, आशिष लाकूडझोडे, महेश काळे, प्रणिता वैद्य, शुभांगी झेंडे आणि अश्विनी बारबोले, सुभाष पिंपळे यांनीही विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष काम करून उपक्रमाला बळ दिले. विविध उपक्रम, खेळ, कथा, गाणी आणि संवाद यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचा आनंद मिळाला.

वर्षभर चाललेल्या या उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू होते. वर्षभर एकत्र राहून शिकण्याचा आणि खेळण्याचा हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी विशेष ठरला.

या उपक्रमात विविध अडचणी येऊनही शिक्षकांनी कोणतीही तक्रार न करता संस्थेच्या परिस्थितीशी जुळवून घेत काम केले. त्यामुळे हा संपूर्ण उपक्रम अधिक प्रभावीपणे पार पडू शकला. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ज्योती एकबोटे, उदय चव्हाण व साई ट्रॅव्हल्स टीम यांचे सहकार्य लाभले. तसेच कीरीटी मोरे, मयूर सेठ, स्वाती जोग, शीला संचेती, अमोल सरमळकर, नरेंद्र मिस्त्री, डॉ. अरुण रोडे, डॉ. अंशु व महेश मुळे आणि अनिल गावडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रज्ञा गुरुकुलचा केंद्रबिंदू म्हणजे संस्थेतील विद्यार्थी. त्यांच्या जिज्ञासेमुळे, स्वप्नांमुळे आणि शिकण्याच्या उत्साहामुळेच हा उपक्रम जिवंत राहतो. वर्षभराचा हा प्रवास पूर्ण झाला असला तरी भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्याचा संस्थेचा मानस आहे.

> **‘‘प्रज्ञा गुरुकुल हा केवळ शिक्षणाचा उपक्रम नाही, तर आदिवासी मुलांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील मुलांना योग्य संधी मिळाली तर तेही मोठी स्वप्ने पाहू शकतात आणि ती पूर्ण करू शकतात. या उपक्रमामधून मुलांमध्ये शिकण्याची आवड आणि स्वतःवर विश्वास निर्माण होताना पाहणे ही आमच्यासाठी सर्वात मोठी समाधानाची गोष्ट आहे.’’**
>
> **डॉ. सपना सेठ**

(पान १ वरून)

## १०० टक्के शास्तीमाफी योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

माफ करण्यात आली होती. त्याला प्रतिसाद मिळत असल्याने ही मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात येत आहे. थकबाकीदार मालमत्ताधारक नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा. मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेकडून वसुलीसाठी कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. त्यामुळे थकीत कराचा संपूर्ण भरणा करून शास्तीमाफीचा लाभ घ्यावा व कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

दरम्यान, कर भरण्यासाठी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पेमेंट सुविधाही उपलब्ध आहे. शहराबाहेर असलेल्या किंवा कर भरण्यासाठी महानगरपालिकेच्या कार्यालयात येऊ न शकणाऱ्या नागरिकांनी देखील शास्तीमाफी योजनाचा फायदा घेण्यासाठी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जावून कराचा भरणा करावा, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

## स्वच्छता व स्वयंशिस्तीतून कचरा मुक्त शहर घडविण्यासाठी योगदान द्या - आमदार संग्राम जगताप

नव्याने उभारलेल्या योगभवनामुळे पावसाळा व उन्हाळ्यातही नागरिकांना व्यायाम, योग व प्राणायामाचा लाभ अखंडपणे घेता येणार आहे. सुदृढ आणि सक्षम पिढी घडविण्यासाठी आजपासूनच योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. भिंगारमध्ये विकासकामांना गती देत परिसराचा कायापालट करण्याचे काम सुरू आहे. भिंगारचा महापालिकेत समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागा व शहराशी असलेले भौगोलिक अंतर यामुळे ते शक्य झाले नाही. त्यामुळे भविष्यात भिंगारमध्ये स्वतंत्र नगरपंचायत स्थापन करून विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अतिक्रमणाच्या मुद्द्यावरही त्यांनी ठाम भूमिका मांडली. शासनाच्या जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणासाठी संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचे सांगत त्यांनी म्हटले की, योग्य वेळी कारवाई केली तर अतिक्रमण होण्याची शक्यता कमी होते. विभागांनी तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून पुढाकार घेऊन कारवाई करावी. पुढील दहा ते पंधरा वर्षांचे नियोजन करून विकासकामे सुरू आहेत आणि प्रशासनाने ठाम भूमिका घेऊन काम केल्यास भिंगार शहर कचरा मुक्त व अतिक्रमणमुक्त करण्याचा संकल्प पूर्ण होईल.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते योगभवनाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

प्रास्ताविकात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी सांगितले की, ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षात योगभवनाचे स्वप्न साकार होत असल्याचा विशेष आनंद आहे. योग आणि प्राणायामासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध झाल्याने आरोग्याची चळवळ अधिक जोमाने पुढे जाईल. ग्रुपच्या माध्यमातून लोकसहभागातून उद्यानातील झाडांसाठी पाण्याचे टँकर उपलब्ध करून देणे, कोरोना काळात रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, वृक्षारोपण व संवर्धन तसेच निरोगी जीवनासाठी योग-व्यायामाचा प्रसार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच स्वच्छता अभियानातही ग्रुप सक्रियपणे सहभागी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सचिन चोपडा यांनी सांगितले की, योगासाठी उभारलेली ही वास्तू केवळ हॉल नसून आरोग्याचे केंद्र ठरणार आहे. सकाळच्या योग-प्राणायामामुळे मानसिक समाधान मिळते आणि आरोग्यदायी जीवनशैलीची जाणीव निर्माण होते. या ठिकाणातून आरोग्यविषयक चळवळीला नवे बळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भिंगार छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी सांगितले की, भिंगार छावणीसाठी यापूर्वी इतका मोठा निधी कधीच मिळाला नव्हता. आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांमुळे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाल्याने विकासकामांना गती मिळाली असून जनसामान्यांच्या समस्या मार्गी लागत आहेत. त्यांच्या विकासकामांमुळे भिंगारची प्रतिमा बदलत आहे. लवकरच भिंगार अतिक्रमणमुक्त करण्यासाठीही पुढाकार घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच शुक्रवार बाजार परिसरातील पाण्याच्या टाकीला गळती लागल्याचा प्रश्न मांडत त्यांनी सांगितले की, दुरुस्ती करण्यापेक्षा नवीन पाण्याची टाकी उभारल्यास भविष्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश पसपुल यांनी केले, तर आभार सर्वेश सपकाळ यांनी मानले.